माजी खासदार दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाहिली श्रद्धांजली >>पान 2

झेंडे नाही, शोषखड्डे करा! जलतज्ञ डॉ. वायाळ यांचा शेतकऱ्यांना थेट संदेश; नागझरीत 'जलतारा'ची क्रांती >>पान 3

संग्रामपूर, चिखली व मेहकर तालुक्यातील रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक जाहीर >>पान 4

**सुविचार**

पूर्ण ते आहे ज्याला प्रारंभ, मध्य, आणि अंत आहे. – ॲरिस्टॉटल


दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 224 ■ मंगळवार, दि. 24 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



अनुष्का शर्मा करणार कमबॅक? अल्लू अर्जुनसोबत शेअर करणार स्क्रीन

आतील पान

# ट्रम्प यांचा एकतर्फी विराम

## ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य न करण्याची घोषणा; इराणकडून प्रतिसाद नाही






**दुबई/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधील ऊर्जा प्रकल्पांवरील संभाव्य हल्ले पाच दिवस लांबणीवर टाकण्याची घोषणा सोमवारी केली. होर्मुझ सामुद्रधुनी खुली केली नाही, तर इराणच्या ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य करण्याचा इशारा त्यांनी दिला होता. इराणने मात्र ट्रम्प यांच्या घोषणेला अमेरिकेची माघार म्हणून संबोधले आहे.

'अमेरिका आणि इराणमध्ये अतिशय चांगली आणि सकारात्मक चर्चा झाली. युद्धावर पूर्ण तोडगा यातून निघेल. ही चर्चा आठवडाभर चालेल,' असा दावा ट्रम्प यांनी समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये केला. पण इराणमध्ये कोणाशी चर्चा केली गेली, याचे तपशील त्यांनी दिले नाहीत. इराणने अमेरिकेशी चर्चा झाल्याचे वृत्त फेटाळले. मात्र,



त्यापूर्वी इराणचे अब्बास अराघची यांनी तुर्कीचे परराष्ट्र मंत्री हकन फिदान यांच्याशी चर्चा केली. अमेरिका आणि इराण यांच्यात चर्चेसाठी तुर्की मध्यस्थी करत आहे. युद्धाचा हा चौथा आठवडा असून, संघर्षात दोन हजारांवर जणांचा बळी गेली आहे.

**'इराणच्या इशाऱ्यामुळेच माघार'**

अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीवरून इराणला ४८ तासांची मुदत दिल्यानंतर इराणनेही अमेरिकेला होर्मुझची सामुद्रधुनी पूर्ण बंद करू, असा इशारा दिला होता. तसेच, पश्र्चिम आशियातील वीज प्रकल्प आणि पर्शियन आखातातील खाणींना लक्ष्य करण्याचा इराणने इशारा दिला होता. इराणच्या या इशाऱ्यामुळे अमेरिकेने माघार घेतली, असे वृत्त इराणच्या सरकारी माध्यमांनी दिले. अमेरिकेने दिलेली मुदत मंगळवारी रात्री बारा वाजता संपणार होती. पण, सोमवारीच ट्रम्प यांनी मुदतीत पाच दिवसांची एकतर्फी वाढ केली.

# अवैध खनिज उत्खननावर कडक कारवाई



## तीन महिन्यांत सर्वेक्षण करुन दोषींवर कारवाई करणार– महसूलमंत्री बावनकुळे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** भिवंडी परिसरासह रायगड, पालघर जिल्ह्यात सुरू असलेल्या बेकायदा खनिज उत्खनन व तस्करीविरोधात कडक कारवाई करण्यात येत आहे. पुढील तीन महिन्यांत मागील पाच वर्षांतील परवानग्यांची चौकशी करून अनियमितता आढळल्यास संबंधितांवर दंड, व्याज आणि फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील. तसेच संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.

भिवंडी व परिसरात तसेच रायगड, पालघर जिल्ह्यात बेकायदा खनिज उत्खनन व तस्करीमुळे शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. याबाबत तत्काळ चौकशी व कारवाईच्या मागणीबाबत विधासभेत सदस्य सुनील प्रभू यांनी लक्षवेधी सूचना मांडली. या चर्चेत सदस्य दिलीप लांडे, राजू खरे, नाना पटोले यांनी सहभाग घेतला.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, बेकायदा खाणकाम व स्टोन क्रशर प्रकल्पांवर तत्काळ बंदीची कारवाई सुरू करण्यात आली आहे. संबंधित ठिकाणी गुन्हे नोंदविणे, दंड वसुली आणि अवैध साठा जप्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

खननासाठी आवश्यक असलेले खाणपट्टा, पर्यावरण परवाना, स्फोटक वापर परवाना, ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला आदी नियम अनेक ठिकाणी पाळले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे जीपीएस व मॅपिंगद्वारे अचूक माहिती संकलित करून अवैध उत्खननाचा संपूर्ण आढावा घेण्यात येणार आहे.

ज्या ठिकाणी परवानगी नसताना खाणकाम व स्टोन क्रशर सुरू आहेत, ती तत्काळ बंद करण्यात येतील. जिल्हाधिकाऱ्यांना थेट जबाबदारी देण्यात आली असून, अवैध साठेही जप्त केले जातील. आवश्यक परवानग्या, पर्यावरण मंजुरी, मायनिंग प्लॅन, स्फोटक परवाना, ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला न घेतलेल्या प्रकल्पांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील खनिज उत्खननाचे अचूक चित्र मिळवण्यासाठी जीपीएस व गूगल मॅपिंगच्या माध्यमातून सर्वेक्षण केले जाईल. मागील पाच वर्षांत परवानग्या देताना झालेल्या अनियमिततांची चौकशीही करण्यात येणार आहे. परवानग्या असलेल्या प्रकल्पांना बाधा न आणता अवैध उत्खनन पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. संबंधित प्रकरणांत अधिकारी सहभागी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई केली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## चोरट्यांनी बँक लुटली, रोख १३.७ लाख रुपये आणि २.१ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे दागिने चोरले

पेशावर –पाकिस्तानमधील खैबर पख्तुनख्वा प्रांताची राजधानी असलेल्या पेशावरमध्ये कोहाट रोडवरील नॅशनल बँकेच्या शाखेतून चोरट्यांनी १३.७ लाख रुपयांची रोख रक्कम आणि २.१० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे दागिने चोरले. बँकेच्या सिक्युरिटी लॉकरमधून चोरट्यांनी दागिने चोरले. डॉन या पाकिस्तानमधील वृत्तपत्राने या संदर्भातले वृत्त दिले आहे.

रात्रीच्या वेळी संरक्षणासाठी कोहाट रोडवरील नॅशनल बँकेच्या शाखेसाठी सुरक्षा रक्षकाची नेमणूक झालेली नाही. यामुळे रात्री पकडले जाण्याचा धोका कमी आहे हे लक्षात आल्यानंतर चोरट्यांनी परिसर निर्मनुष्य होण्याची वाट बघितली आणि संधी साधली. बँकेचे धातूचे शटर आणि कुंपण तसेच सिक्युरिटी लॉकर तोडण्यासाठी चोरट्यांनी गॅस कटर, हातोडा, पक्कड या साधनांचा वापर केला. चोरट्यांनी लॉकर तोडून ४०० तोळं सोनं चोरलं. या सोन्याची किंमत २.१० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

संशयितांना ओळखण्यासाठी आणि अटक करण्यासाठी बँकेच्या आजूबाजूच्या इमारतींमध्ये लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधील आणि शहरातील 'सेफ सिटी प्रोजेक्ट'मधील फुटेज तापसण्याचे काम सुरू असल्याचे स्थानिक पोलिसांनी सांगितले.

## पिंपळनेरमध्ये थरारक प्रकार; कौटुंबिक वादातून पत्नीवर पतीचा हल्ला, प्रकृती चिंताजनक






**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी :** पिंपळनेर येथे कौटुंबिक वादाने हिंसक वळण घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पतीनेच पत्नीवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याने परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घटना पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. गोरख महाले (संशयित) याने पत्नी यशोदा महाले या माहेरी एकट्या असताना त्यांच्यावर धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यात यशोदा महाले यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर धुळे येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे.

पिंपळनेर परिसरात अल्पावधीत घडलेली ही तिसरी गंभीर घटना असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी संजय भांबळे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण बर्गे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने घटनास्थळावरून पुरावे गोळा करण्यात आले असून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. दरम्यान, हल्ल्यानंतर आरोपी फरार झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी दोन विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## धुळे हादरलं! एलसीबीची धडक कारवाई; ५७० किलो गांजा जप्त, एकाला अटक





**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तब्बल ५७० किलो गांजाचा साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धुळे शहरातील पवन नगर (हुडको) परिसरात मोठ्या प्रमाणावर गांजा साठवून ठेवण्यात आल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना मिळाली होती. माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकत विश्वजीत ज्ञानेश्वर चौगुले यांच्या घरावर धाड घातली. या छाप्यात घरातून मोठ्या प्रमाणात गांजाचा साठा आढळून आला.

आरोपीला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता मोहाडी येथील त्याच्या दुसऱ्या घरातही गांजाचा साठा असल्याचे उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी तेथेही कारवाई करत एकूण ५७० किलो गांजा जप्त केला.

जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत सुमारे १ कोटी ४२ लाख ६५ हजार रुपये इतकी असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांनी सर्व मुद्देमाल जप्त करून आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. या मोठ्या कारवाईमुळे धुळे शहरासह जिल्ह्यात अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात पोलिसांचा धाक वाढला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.




# ग्रामीण भागापर्यंत आधुनिक आरोग्य सेवा पोहोचविण्यास 'पल्स वैद्यकीय परिषद' ठरणार महत्त्वपूर्ण : मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी

## आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी चोख नियोजनाचे निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ग्रामीण भागापर्यंत दर्जेदार वैद्यकीय सुविधा पोहोचविण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्वपूर्ण पाऊल उचलले असून, 'पल्स वैद्यकीय परिषद' या आंतरराष्ट्रीय व्यासपीठाद्वारे राज्याच्या आरोग्य क्षेत्राला नवी दिशा मिळणार आहे. जिओ कन्व्हेन्शन सेंटर येथे २७ व २८ मार्च २०२६ रोजी आयोजित या परिषदेच्या नियोजनासाठी चोख तयारी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी दिले. मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या परिषदेत विविध देशांतील नामांकित तज्ज्ञ, संशोधक, उद्योगपती आणि धोरणकर्ते सहभागी होणार असून, आरोग्य क्षेत्रातील नव्या संधी आणि तंत्रज्ञानाचा लाभ राज्याला मिळणार आहे. सुमारे ३० संस्थांसोबत सामंजस्य करार होणार असल्याने आरोग्य सेवा, संशोधन आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे.

एकात्मिक आरोग्य व्यवस्था उभारण्यावर भर

आयुर्वेद आणि ॲलोपॅथी पद्धतींचा समन्वय साधून एकात्मिक आरोग्य व्यवस्था उभारण्यावर या परिषदेत विशेष भर दिला जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत आधुनिक व सर्वसमावेशक आरोग्य सुविधा पोहोचविण्यास मदत होणार आहे.

या व्यासपीठावर आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, औषधनिर्मिती उद्योग, स्टार्टअप आणि वेलनेस पर्यटन या क्षेत्रातील घटक एकत्र येणार असून, नव्या कल्पना आणि सहकार्याच्या संधी निर्माण होणार आहेत. परिणामी रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा, डॉक्टरांना नव्या संधी आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण व संशोधनाचा अनुभव मिळणार आहे.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी वैद्यकीय शिक्षण विभाग, एमएमआरडीए, उद्योग विभाग, मुंबई महानगरपालिका, आरोग्य विभाग तसेच विविध संस्थांचे समन्वयाने नियोजन सुरू असून, ही परिषद महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्राला आंतरराष्ट्रीय पातळीवर नवे स्थान मिळवून देणारी ठरणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## न्यायव्यवस्थेने दाखवलेली संवेदनशीलता

संयुक्त राष्ट्रसंघाशी संबंधित आणि चिरंतर विकासाच्या विषयावर काम करणाऱ्या संस्थेने (जागतिक आनंद अहवाल २०२६) दरवर्षीप्रमाणे 'आनंदी देश निर्देशांक' अहवाल जाहीर केला आहे. त्यामध्ये जगातील विविध देशांमधील आनंदाचे प्रमाण कसे आहे आणि कोणता देश कोणत्या क्रमांकावर आहे, याची यादी जाहीर केली आहे. यामध्ये फिनलंड सलग ९ व्या वर्षी जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे. हा अहवाल गॅलप, संयुक्त राष्ट्र आणि ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या वेलबीइंग रिसर्च सेंटरद्वारे जारी केला जातो. जागतिक आनंद अहवाल २०२६ सादर करताना चार महत्त्वाच्या निकषांचा/घटकांचा विचार केला जातो ते म्हणजे जीवन मूल्यांकन, दरडोई जीडीपी, सामाजिक आधार, आणि आरोग्यदायी आयुर्मान. तसेच स्वातंत्र्य, उदारता आणि भ्रष्टाचाराची धारणा या घटकांचा अभ्यास देखील केला जातो. फिनलंड पहिल्या स्थानावर, आइसलँड (२), डेन्मार्क (३), कोस्टा रिका (४) आणि स्वीडन (५) हे अव्वल ५ आनंदी देश आहेत. फिनलंडमध्ये एक म्हण आहे, 'बोलणे चांदी आहे, पण शांतता सोने आहे.' एकांत आणि शांतता आवडणारा असा हा देश आहे. टॉप १० मध्ये नॉर्वे, नेदरलँड्स, इस्रायल, लक्झेंबर्ग आणि स्वित्झर्लंडसारखे देश आहेत. समान समृद्धी, उत्कृष्ट आरोग्य सेवा आणि मजबूत सरकारी सुरक्षा कवच, येथे श्रीमंत-गरीब यांच्यातील दरी कमी आहे, ज्यामुळे मंदीसारख्या कठीण काळातही लोकांच्या चेहऱ्यावर हास्य टिकून राहते.भारत ११६व्या क्रमांकावर असून, नेपाळ (९९), पाकिस्तान (१०४) हे शेजारील देश भारताच्या वर आहेत, तर बांगलादेश (१२७), श्रीलंका (१३४) भारताच्या मागे आहेत. कोस्टा रिकाने चौथ्या स्थानावर मोठी झेप घेतली आहे. सलग दुसऱ्या वर्षी पहिल्या १० देशांत कोणतीही इंग्रजी भाषिक (अपसश्रीहिशीश) देशाचा समावेश नाही. अहवालानुसार, 'स्वातंत्र्य घटका'च्या बाबतीत भारताची कामगिरी कमकुवत आहे. हा घटक हे मोजतो की, व्यक्तींना आपल्या आयुष्यात खरोखरच काही पर्याय उपलब्ध आहेत असे वाटते का आणि त्या पर्यायांमुळे त्यांना समाधान मिळते का? लोकशाही ही मुळात स्वातंत्र्यावरच बहरली पाहिजे. तरीही, अनेक भारतीयांना आपण बंधनात आहोत असे वाटते, हे बंध नेहमीच कायद्यांचे नसतात, तर सामाजिक अपेक्षा, इतरांशी केली जाणारी तुलना आणि इतरांच्या 'बरोबरीने राहण्याच्या' सततच्या शर्यतीमुळे निर्माण झालेले असतात. यामुळे एक प्रश्न उभा राहतो, आपले आयुष्य आपण आपल्या पद्धतीने जगत असताना आपण खरोखरच मुक्त आहोत का? की आपण केवळ इतरांनी घालून दिलेल्या निकषांचा (लशपलहारीज्ञी) पाठलाग करत आहोत? सर्वात चिंताजनक बाब ही आहे की, आनंदात घट २५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या तरुणांमध्ये सर्वाधिक दिसून आली आहे. जिथे जगाच्या इतर भागांमध्ये तरुण जीवनावर समाधानी आहेत, तिथे अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडसारख्या श्रीमंत देशांमधील किशोरांच्या आनंदाचा आलेख वेगाने खाली घसरला आहे. संशोधक यासाठी स्मार्टफोन आणि सोशल मीडियाला जबाबदार मानतात. पण गोष्ट इतकी सरळ नाही. गॅलपमधील वर्ल्ड न्यूजच्या व्यवस्थापकीय संपादक ज्युली रे म्हणतात, खरी समस्या 'सामाजिक सहवासाची' कमतरता आहे. जेव्हा तरुणांना आपल्या लोकांशी जोडले गेल्याचे वाटत नाही, तेव्हा ते एकटेपणा दूर करण्यासाठी स्क्रीनचा आश्रय घेतात. दुर्दैवाने, सोशल मीडियावरील ही डिजिटल निर्भरता त्यांचा आनंद वाढवण्याऐवजी त्यांची उदासीनता आणखी वाढवते. सोशल मीडियावर वाढती तुलनात्मक भावना भारतीयांचे मानसिक समाधान कमी करत आहे. युद्धाच्या परिस्थितीतही इस्रायलने पहिल्या १० मध्ये स्थान प्राप्त केले आहे. तज्ज्ञांनुसार, इस्रायलमध्ये 'सामाजिक एकजूट' आणि 'कौटुंबिक आधार' खूप मजबूत आहे, जो संकटाच्या वेळी मानसिक बळ देतो. युद्धाच्या परिस्थितीतही युक्रेनमध्ये (१०५वे) 'सामायिक उद्दिष्टाची' भावना आणि रशियामध्ये (७२वे) मध्यम स्थिरता कायम आहे, ज्यामुळे दोघांच्या क्रमवारीत मोठी घसरण झाली नाही. पण भारताच्या बाबतीत युद्ध दुसऱ्या देशांचे चालू आहे तरी भारतीय काळजी करतात ज्यामुळे आनंदी न राहता सतत टेंशनमध्ये राहतात. ताज्या अहवालात भारताचे चित्र आशा आणि आव्हान, दोन्ही दर्शवते. २०२४ (१२६) आणि २०२५ (११८) च्या तुलनेत स्थिती सातत्याने सुधारत आहे. भारताची हळू पण निश्चित वाढ होत आहे. तथापि, आपण शेजारील देश चीन (६५), नेपाळ (९९) आणि पाकिस्तान (१०४) यांच्या मागे आहोत. इप्सॉसच्या आनंद सर्वेक्षणात २९ देशांच्या यादीत भारत २२व्या स्थानावर आहे. गेल्या वर्षी ७ व्या स्थानावर होता. दोन्ही अहवालानुसार आनंद कमी होण्याची सर्वात मोठी कारणे 'आर्थिक असुरक्षितता' आणि 'सोशल मीडियाचा दबाव' आहे. सोशल मीडियावर वाढती तुलनात्मक भावना भारतीयांचे मानसिक समाधान कमी करत आहे. डिजिटल जगाचा सर्वात खोल आणि नकारात्मक परिणाम १५ वर्षांच्या मुलींवर दिसून येत आहे. ज्या मुली ५ तासांपेक्षा जास्त वेळ सोशल मीडियावर घालवतात, त्या जीवनात सर्वात कमी समाधानी आहेत. 'इन्फ्लुएंसर कल्चर' आणि 'परफेक्ट लाइफ'च्या रील्स पाहून त्यांच्यात स्वतःला कमी लेखण्याची भावना आणि तुलनात्मक ताण वाढत आहे. सोशल मीडियावर 'कंटेंट पाहणे' त्यांना मानसिकदृष्ट्या उदासीनता आणि एकाकीपणाकडे ढकलत आहे, ज्यामुळे त्यांचे खरे हसू फिके पडत आहे. आपल्या माणसांच्या सोबतीची कमतरता मानसिक शांती आणखी कमी करत आहे, भविष्यातील अनिश्चितता हेदेखील मोठे कारण आहे.

# माजी खासदार दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाहिली श्रद्धांजली

## ➤ जन्मगावी पवनार येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार
## ➤ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मंत्री बावनकुळे, राज्यमंत्री भोयर, जयस्वाल यांची उपस्थिती





**वर्धा/प्रतिनिधी :** माजी खासदार तथा माजी राज्यमंत्री दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर त्यांच्या जन्मगावी पवनार येथे आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अंत्यविधीला उपस्थित होते. दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहून मुख्यमंत्री व अन्य मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार अमर काळे, आमदार सर्वश्री अभिजित वंजारी, आमदार समीर कुणावार, राजेश बकाने, चरण ठाकूर, माजी मंत्री रणजित देशमुख, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहीर, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक, जिल्हाधिकारी वान्मथी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, माजी खासदार रामदास तडस, सुरेश वाघमारे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्यासह माजी खासदार, आमदार व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दत्तामेघे यांचे काल नागपूर येथे निधन झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन पार्थिवाचे दर्शन घेतले होते. आज मुख्यमंत्र्यांनी अंत्यविधीला उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी पोलिस दलाच्यावतीने बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना देण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व अन्य मान्यवरांनी दत्ता मेघे यांच्या पत्नी शालिनीताई दत्ताजी मेघे, पुत्र सागर मेघे व आमदार समीर मेघे यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

वर्धा जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते, नागरीक दत्ताजी मेघे यांच्याशी जुळले होते. त्यांनी माझ्यासारखे अनेक आमदार, खासदार घडविले. राजकारणापेक्षा समाजकारणावर त्यांचा अधिक भर होता. प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी हे दाखवून दिले. त्यांच्या जाण्याने सामाजिक, राजकीय क्षेत्रासह वर्धा जिल्ह्याचे कधीही भरुन न निघणारे नुकसान झाले आहे, असे यावेळी शोक संवेदना व्यक्त करतांना राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले.

# 'पल्स' वैद्यकीय परिषदेमुळे आरोग्यव्यस्थेचा पाया अधिक बळकट : वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री हसन मुश्रीफ



पल्स वैद्यकीय परिषदेच्या माध्यमातून आरोग्य व वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील नवोन्मेष, संशोधन पुढे येईल. या क्षेत्रात नवनवीन संकल्पना, कार्य करणाऱ्या स्टार्टअप्सलाही परिषदेत व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. जगभरातून उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले तज्ज्ञ, अभ्यासक, संशोधक परिषदेत येणार आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्यवस्थेचा पाया अधिक बळकट करणे शक्य होणार आहे.

भविष्यातील वैद्यकीय शिक्षण हे केवळ पुस्तकांपुरते मर्यादित राहणार नाही, तर तंत्रज्ञानाधारित, संशोधनकेंद्रित आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित असणे अत्यावश्यक आहे. आज आरोग्य क्षेत्र झपाट्याने बदलत आहे, त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांना केवळ पदवी नव्हे, तर जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता देणे ही काळाची गरज आहे. यासाठी काही महत्त्वाचे बदल आवश्यक आहेत. डिजिटल आणि सिम्युलेशन-आधारित शिक्षण, व्हर्चुअल लॅब्स, थ्री-डी ॲनाटॉमी, सर्जिकल सिम्युलेटर यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळेल. एआय आणि डेटा ॲनालिटिक्सचा समावेश, रोग निदान, रोग नियंत्रण आणि संशोधनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता समजणे अत्यंत गरजेचे ठरेल. संशोधन संस्कृतीला प्रोत्साहन, वैद्यकीय महाविद्यालयात रिसर्च लॅब्स, स्टार्टअप कक्ष आणि आंतरराष्ट्रीय जर्नल्सशी जोडणी वाढवणे. ग्रामीण व समुदायाधारित प्रशिक्षण, विद्यार्थ्यांनी गावपातळीवर आरोग्यसेवा समजून घेतल्यास त्यांची सामाजिक जाणीव वाढेल. आंतरराष्ट्रीय सहकार्य व एक्सचेंज प्रोग्राम, परदेशी विद्यापीठांशी भागीदारी करून जागतिक दर्जाचे शिक्षण अनुभवण्याची संधी. मल्टिडिसिप्लिनरी दृष्टिकोन, वैद्यकीय शिक्षणासोबत व्यवस्थापन, तंत्रज्ञान आणि संवाद कौशल्यांचा समावेश. थोडक्यात, भविष्यातील डॉक्टर केवळ उपचार करणारे नसून तंत्रज्ञान जाणणारे, संशोधनप्रिय आणि समाजाभिमुख आरोग्यदूत असावेत, हा राज्य शासनाचा दृष्टिकोन आहे. महाराष्ट्र याच दिशेने वैद्यकीय शिक्षणात बदल घडवून आणत आहे.

### डिजिटल हेल्थ आणि डेटा ॲनालिटिक्स

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय वैद्यकीय क्षेत्रात खऱ्या अर्थाने क्रांती घडवू शकते, कारण ती डॉक्टरांच्या कौशल्याला पूरक ठरते. एआयमुळे आजारांचे लवकर आणि अधिक अचूक निदान, एक्स-रे, एमआरआय, सीटी-स्कॅन यासारख्या तपासण्यांचे जलद विश्लेषण आणि उपचाराची योग्य दिशा ठरवणे शक्य होत आहे. त्यामुळे रुग्णाचा वेळ वाचतो, चुका कमी होतात आणि उपचार अधिक परिणामकारक होतात. भविष्यात एआय आधारित रोबोटिक सर्जरी, वैयक्तिकृत उपचार योजना आणि रोगाचा पूर्वानुमान हे मोठे बदल घडवतील. डिजिटल हेल्थ आणि डेटा ॲनालिटिक्स यांचे महत्त्वही तितकेच मोठे आहे. डिजिटल नोंदी, ई-हॉस्पिटल प्रणाली, ऑनलाईन रिपोर्ट्स आणि मोबाईल हेल्थ ॲप्स यामुळे आरोग्यसेवा अधिक पारदर्शक आणि सुलभ होते. डेटा ॲनालिटिक्समुळे राज्य शासनाला रोगांचे ट्रेंड, लसीकरणाची गरज, संसर्गाचा प्रसार आणि आरोग्य धोरणांची दिशा अचूकपणे समजते. म्हणजेच, निर्णय हे अंदाजावर नव्हे तर अचूक माहितीवर आधारित घेतले जातात.

### आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत सहकार्य

आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत सहकार्याची शक्यता अत्यंत सकारात्मक आणि व्यापक आहे. एक्सचेंज प्रोग्राम, संयुक्त संशोधन प्रकल्प, ऑनलाईन अभ्यासक्रम आणि प्राध्यापक-विद्यार्थी देवाणघेवाण यामुळे आपल्या विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे ज्ञान आणि अनुभव मिळेल. महाराष्ट्रातील वैद्यकीय महाविद्यालयांना यामुळे आंतरराष्ट्रीय ओळख मिळेल आणि आपल्या डॉक्टरांना जगभरात स्पर्धा करण्याची ताकद प्राप्त होईल. थोडक्यात, एआय, डिजिटल हेल्थ आणि जागतिक सहकार्य यांची सांगड घातली तर महाराष्ट्राचे आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्र आधुनिक, अचूक आणि जागतिक दर्जाचे बनू शकते.

संशोधनाला चालना देणे ही राज्य शासनाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. कारण नवीन औषधे, आधुनिक उपचार पद्धती आणि तंत्रज्ञानाची प्रगती ही संशोधनातूनच घडते. यासाठी राज्य शासनाकडून वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये संशोधन प्रयोगशाळा बळकट करणे,

विशेष संशोधन अनुदाने देणे, बायो-डेटा व क्लिनिकल स्टडीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि उद्योग-संशोधन संस्था-शासकीय विभाग यांच्यात सहकार्य वाढवणे अशी ठोस पावले उचलली जात आहेत.

तसेच पेटंट प्रक्रियेसाठी आर्थिक व तांत्रिक मदत, आंतरराष्ट्रीय जर्नल्सशी जोडणी आणि संयुक्त संशोधन प्रकल्प यांना प्रोत्साहन दिले जात आहे, जेणेकरून राज्यातील संशोधन जागतिक स्तरावर पोहोचेल.

### "चर्चेपासून कृतीकडे" नेणारी परिषद

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'पल्स' परिषद ही एक मोठी संधी आणि प्रेरणादायी व्यासपीठ ठरेल. या परिषदेमुळे विद्यार्थ्यांना-देश-विदेशातील तज्ज्ञांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन ऐकण्याची संधी, नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल हेल्थ यांचा प्रत्यक्ष अनुभव, संशोधन पोस्टर सादरीकरण, पेपर प्रेझेंटेशन आणि स्पर्धांमध्ये सहभाग घेणे, इंटर्नशिप, फेलोशिप आणि करिअर नेटवर्किंगच्या संधी आणि स्टार्टअप व इनोव्हेशन क्षेत्रातील मार्गदर्शन म्हणजेच ही परिषद विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणार नाही, तर आत्मविश्वास, दृष्टी आणि जागतिक स्तरावर पुढे जाण्याची प्रेरणा देईल. भविष्यातील डॉक्टर केवळ उपचार करणारे नसून संशोधनप्रिय आणि तंत्रज्ञानसज्ज असावेत, यासाठी ही परिषद महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

थोडक्यात, 'पल्स' परिषद ही "चर्चेपासून कृतीकडे" नेणारी परिषद असेल जिथे निष्कर्ष थेट धोरणात आणि धोरण थेट जनतेच्या हिताच्या उपक्रमात रूपांतरित होईल. 'पल्स' परिषदेचा व्यापक दृष्टीकोन हा केवळ एका वर्षाचा किंवा एका प्रकल्पाचा नाही, तर पुढील काही वर्षांचा आरोग्य रोडमॅप ठरवण्याचा आहे. आम्ही महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्राला असे पाहतो की जिथे प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळेल मग तो शहरात राहो किंवा दुर्गम गावात.

### महाराष्ट्र : आंतरराष्ट्रीय हेल्थ डेस्टिनेशन

पुढील दशकात आमची स्पष्ट दिशा अशी आहे की, महाराष्ट्राला डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य व्यवस्थेत देशात अग्रस्थानी नेणे, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनात राज्याला जागतिक दर्जाचे केंद्र बनवणे, ग्रामीण व आदिवासी भागात मजबूत प्राथमिक आरोग्य सुविधा उभ्या करून आरोग्यसेवेतील असमानता कमी करणे, मेडिकल आणि वेलनेस पर्यटनाच्या माध्यमातून महाराष्ट्राला आंतरराष्ट्रीय हेल्थ डेस्टिनेशन म्हणून ओळख मिळवून देणे. स्टार्टअप्स, मेडटेक आणि बायोटेक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती घडवून आणणे. या सर्वांचा अंतिम उद्देश एकच आहे महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक आधुनिक, तंत्रज्ञानसज्ज, संशोधनप्रधान आणि सर्वसमावेशक बनवणे. 'पल्स' परिषद म्हणजे या प्रवासाची सुरुवात आहे, जिथून पुढील दहा वर्षांसाठी ठोस दिशा आणि आत्मविश्वास मिळेल.

जागतिक आरोग्य संघटनांचा सहभाग हा महाराष्ट्रासाठी आणि आपल्या देशासाठी विश्वास, पारदर्शकता आणि आंतरराष्ट्रीय मान्यता यांचा स्पष्ट संदेश देणारा आहे. जेव्हा अशा नामांकित संस्था आपल्या परिषदेचा भाग होतात, तेव्हा जगाला हे दिसून येते की महाराष्ट्र आरोग्य क्षेत्रात गंभीरपणे आणि दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवून काम करत आहे. यामुळे दोन महत्त्वाचे संदेश जातात. पहिला म्हणजे आपली आरोग्य व्यवस्था जागतिक दर्जाची बनवण्याचा आपला निर्धार ठाम आहे. दुसरा म्हणजे- ज्ञान, संशोधन आणि सर्वोत्तम पद्धती स्वीकारण्यासाठी आपण तयार आहोत.

### महाराष्ट्र: भारताचा हेल्थ गेटवे

भारताला आरोग्य क्षेत्रात "ग्लोबल हब" बनवण्याच्या प्रवासात महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आणि नेतृत्व करणारी असेल. आपल्या राज्यात आधीपासूनच जागतिक दर्जाची रुग्णालये, कुशल डॉक्टर, मजबूत वैद्यकीय शिक्षण व्यवस्था, औषधनिर्मिती उद्योग, प्रगत तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. मुंबई, पुणे, नागपूरसारखी शहरे आधीच आरोग्यसेवा, संशोधन आणि मेडिकल टूरिझमची मोठी केंद्रे बनली आहेत. 'पल्स' परिषदेच्या माध्यमातून आम्ही गुंतवणूक, संशोधन सहकार्य, स्टार्टअप इकोसिस्टीम आणि वेलनेस पर्यटन या सर्व घटकांना एकत्र आणत आहोत. यामुळे महाराष्ट्र केवळ राज्यापुरता मर्यादित न राहता भारताचा हेल्थ गेटवे म्हणून उभा राहू शकतो. जिथे जगभरातून रुग्ण उपचारासाठी, विद्यार्थी शिक्षणासाठी आणि उद्योग गुंतवणुकीसाठी येतील.

### महाराष्ट्र शासन तुमच्या संशोधनाला, स्टार्टअप कल्पनांना आणि जागतिक संधींना नेहमी पाठिंबा देण्यासाठी कटिबद्ध

माझा युवा डॉक्टर आणि संशोधकांना एकच संदेश आहे "फक्त पदवी मिळवणारे डॉक्टर न होता, परिवर्तन घडवणारे डॉक्टर बना." आज वैद्यकीय क्षेत्र अतिशय वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान, संशोधन आणि नवकल्पना यांना स्वीकारणे ही काळाची गरज आहे. आपल्या ज्ञानासोबत संवेदनशीलता, सामाजिक जाणीव आणि सतत शिकण्याची वृत्ती ठेवली तर आपण केवळ चांगले डॉक्टरच नव्हे, तर समाजाचे खरे आरोग्यदूत बनू शकता, महाराष्ट्र शासन तुमच्या संशोधनाला, स्टार्टअप कल्पनांना आणि जागतिक संधींना नेहमी पाठिंबा देण्यासाठी कटिबद्ध आहे.या परिषदेचा महाराष्ट्राच्या सामान्य नागरिकांना थेट आणि दीर्घकालीन फायदा होणार आहे. अधिक दर्जेदार आणि आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध होतील. डिजिटल हेल्थ आणि टेलिमेडिसिनमुळे गावागावात तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला सहज मिळेल.

औषधनिर्मिती आणि वैद्यकीय क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, वेलनेस आणि मेडिकल पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. आरोग्यविषयक जनजागृती वाढल्याने लोक अधिक सजग आणि निरोगी जीवनशैलीकडे वळतील.

'पल्स' परिषद ही केवळ तज्ज्ञांची किंवा उद्योगांची परिषद नसून महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या आरोग्य, रोजगार आणि भविष्याशी थेट जोडलेली एक सकारात्मक चळवळ आहे. एका मोठ्या प्रवासाची सुरुवात आहे जिथे महाराष्ट्र आरोग्य, शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या बळावर देशात आणि जगात एक आदर्श राज्य म्हणून उभे राहील.

००००० ००००० ००००० ०००००

**शब्दांकन दत्तात्रय कोकरे,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

००००० ००००० ००००० ०००००

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# झेंडे नाही, शोषखड्डे करा! जलतज्ञ डॉ. वायाळ यांचा शेतकऱ्यांना थेट संदेश; नागझरीत 'जलतारा'ची क्रांती

## जागतिक जल दिनी नागझरीत जलसाक्षरतेचा मेळावा; शोषखड्ड्यामुळे शेतात येणार 'समृद्धीची गंगा'







**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** निसर्गाच्या लहरीपणामुळे कोरडवाहू शेती संकटात सापडत असताना मानवी इच्छाशक्ती आणि विज्ञानाच्या जोरावर त्यावर मात करता येते, याचा जिवंत आदर्श नागझरी येथे 'जलतारा' प्रकल्पातून पाहायला मिळाला. जागतिक जल दिनानिमित्त (२२ मार्च २०२६) जिल्हा परिषद शाळा, नागझरी बु. येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात जलतज्ञ प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी प्रभावी मार्गदर्शन करत जलसाक्षरतेचा नवा मंत्र दिला.

''पाणी हे अमृत आहे; त्याची जपणूक हीच आपली जबाबदारी,'' असे सांगत डॉ. वायाळ यांनी 'जलतारा शोषखड्डा' हा दुष्काळावर शाश्वत उपाय असल्याचे स्पष्ट केले. ५५ फूट रुंद आणि ६ फूट खोल, काळ्या पाषाणांनी भरलेला हा खड्डा एका पावसाळ्यात तब्बल ३ लाख ६० हजार लिटर पाणी भूगर्भात मुरवतो, असे त्यांनी सांगितले. यामुळे जमिनीचा पोत सुधारतो, उत्पादन वाढते आणि शेत 'चिबडण्यापासून' वाचते. यावेळी त्यांनी तरुणांना थेट संदेश देत म्हटले की, ''नेत्यांचे झेंडे मिरवण्यापेक्षा शेतात शोषखड्डा करा. विहिरीत २४ तास पाणी असेल, तर तुमचा मुलगा शहराकडे नोकरीसाठी जाणार नाही.''

प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी गावातील शेतकरी प्रकाश गोलाईत, विठोबा देवकर, गजानन देवकर, वासुदेव देवकर आणि जयशिंग गोलाईत यांनी जालना जिल्ह्यातील वाटूर येथे डॉ. वायाळ यांच्या शेताला भेट देऊन या प्रकल्पाचे यश प्रत्यक्ष अनुभवले. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच दिलीप गवई होते.

प्रमुख अतिथी म्हणून कृषी सहाय्यक संतोष गायकवाड आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रचारक विनोद खरपे उपस्थित होते. गावासह परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी या मेळाव्यास उपस्थित होते. सुत्रसंचालन व आभार कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आदर्श शिक्षक लक्ष्मण देवकर यांनी केले, तर प्रास्ताविक दीपक देवकर यांनी केले. नागझरी गाव टँकरमुक्त करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

डॉ. वायाळ यांचा संदेश ''शेतकऱ्याचा सातबारा कोरा करण्यापेक्षा त्याचा भूगर्भ पाण्याने भरला, तर तो स्वतःच आपला सातबारा कोरा करेल. 'जलतारा' हा खड्डा नसून पुढच्या पिढीची जीवनवाहिनी आहे. नागझरीच्या रानातून आता 'जलतारा'च्या माध्यमातून समृद्धीची गंगा वाहण्याची आशा निर्माण झाली असून, हा उपक्रम संपूर्ण तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## स्मशानभूमी अतिक्रमणावरून संताप; पेनटाकळी धरणात तिघांचे जलसमाधी आंदोलन



**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील सारशिव गावातील स्मशानभूमीच्या जागेवर झालेल्या अतिक्रमणाच्या निषेधार्थ तिघा युवकांनी पेनटाकळी धरणात जलसमाधी आंदोलन सुरू करत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. या आंदोलनामुळे परिसरात खळबळ उडाली असून प्रशासनावर दबाव वाढला आहे. मनिष जाधव, प्रविण राजगुरू आणि पंकज वाघ या युवकांनी स्मशानभूमीची अतिक्रमित जागा तातडीने मोकळी करून द्यावी, या प्रमुख मागणीसाठी आंदोलन छेडले आहे. सारशिव गावात सुमारे दीड एकर जागा हिंदू स्मशानभूमीसाठी राखीव असून, त्या ठिकाणी गावातीलच एका व्यक्तीने अतिक्रमण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित अतिक्रमित जागेला तार कंपाऊंड घालून त्यावर विद्युत प्रवाह सोडणारी यंत्रणा (झटका मशीन) बसवण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषद शाळेच्या परिसरातील अतिक्रमणही तातडीने हटवावे, अशी मागणी करण्यात येत आहे. या मागण्यांसाठी यापूर्वी अनेकदा प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे संतप्त युवकांनी अखेर जलसमाधी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. या गंभीर प्रश्नावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण मेहकर तालुक्याचे लक्ष लागले असून, परिस्थिती तणावपूर्ण बनण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## अनोळखी इसमाचा मृत्यू; ओळखणाऱ्यांनी संपर्क करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पोलीस स्टेशन, बुलढाणा शहर परिसरातील केळवद शिवार येथून एका अनोळखी इसमास उपचारासाठी सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथे दाखल करण्यात आले होते. या इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि. १९ रोजी सुमारे ३५ वर्षे वयाचा एक अनोळखी इसम केळवद शिवार येथे आढळून आला. त्या इसमास १०८ रुग्णवाहिकेद्वारे जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना दि. २२ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता त्याचा मृत्यू झाला. सदर इसमाजवळ कोणतीही ओळख पटविणारी कागदपत्रे आढळून आलेली नसून त्याचे नातेवाईक अद्याप समोर आलेले नाहीत. त्यामुळे संबंधित व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. मृत इसमाचे वर्णन याप्रमाणे : रंग सावळा, वय अंदाजे ३५ वर्षे, उंची सुमारे ५ फूट ३ इंच, बांधा सडपातळ, इसमाच्या अंगावर लाल रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट आहे. अशा वर्णनाशी साधर्म्य असलेल्या व्यक्तीची ओळख पटल्यास त्वरित शासकीय रुग्णालय पोलीस चौकी, बुलढाणा येथे किंवा एएसआय वाणी मो.क्रं. ९८५०९२३१०१, नरेद्र रोटे ९६२३२४३७३३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## केकेआरच्या संघात सौरभ दुबेला संधी

नवी दिल्ली : तीन वेळचे चॅम्पियन कोलकाता नाईट रायडर्सने विदर्भातील उंच डावखुरा वेगवान गोलंदाज सौरभ दुबेला करारबद्ध केले आहे. तो भारताचा वेगवान गोलंदाज आकाश दीपची जागा घेणार आहे. आकाश दीप जो पाठीच्या स्ट्रेस रिॲक्शन दुखापतीमुळे आयपीएलमधून बाहेर झाला आहे. दुबेला यापूर्वी २०१६ च्या चॅम्पियन सनरायझर्स हैदराबादने आयपीएल २०२२ साठी करारबद्ध केले होते. पण पाठीच्या दुखापतीमुळे त्याचा कार्यकाळ लवकरच संपुष्टात आला. फ्रँचायझीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, ''होय, केकेआरने आगामी हंगामासाठी आकाश दीपचा बदली म्हणून क्रिकेटपटू सौरभ दुबेला करारबद्ध केले आहे. सौरभ केकेआरसाठी नेट बॉलर होता. तो ईडन गार्डन्स आणि मुंबई कॅम्पमध्ये संघासोबत सराव करत होता, पण आता तो मुख्य संघाचा भाग असेल.

# शिवसेना शिव लहुसेनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन




**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** लग्न समारंभ व इतर कार्यक्रमांमध्ये पारंपारिक बँड पथकाचा वापर केला जात होता, मात्र विविध कारणांमुळे अलीकडच्या काळामध्ये याचा वापर कमी झाल्याने या बँड पथकातील संपूर्ण कलावंतांवर आणि त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे, त्यामुळे बँड पथकातील कलाकारांना लोक कलावंताचा दर्जा देण्यात यावा, त्यांना शासकीय मानधन देण्यात यावे, बँड पथकाला पुनर्जीवित करण्यासाठी १० लाख रुपयांचे शासकीय अनुदान देण्यात यावे, यासह इतर मागण्यांसाठी शिवसेना शिवलहू सेनेच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले, मागण्या मंजूर न झाल्यास तीव्र स्वरूपाचा आंदोलनाचा

# अनुष्का शर्मा करणार कमबॅक? अल्लू अर्जुनसोबत शेअर करणार स्क्रीन

**दैनिक आपला विदर्भ**


**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री अनुष्का शर्माने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. मात्र तिच्या मुलांच्या जन्मानंतर तिनं अभिनय क्षेत्रापासून ब्रेक घेतला. सध्या ती लंडनमध्ये राहत असून मुलांचं संगोपन करत असल्याचं म्हटलं जातं. मात्र आता ती आठ वर्षानंतर पुन्हा एकदा सिनेसृष्टीत कमबॅक करणार आहे.

अल्लू अर्जुन त्याच्या AA22xA6 या आगामी बिग बजेट चित्रपटातून झळकणार आहे. हा एक सायन्स फिक्शन चित्रपट असून याचे नाव बदललं जाणार आहे. एटली या चित्रपटाचं दिग्दर्शन करत आहे.

एका वृत्तानुसार दीपिका पादुकोण चित्रपटात मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेतून झळकणार आहे. तर यात अनुष्का शर्मा देखील दिसणार असल्याचे म्हंटले जात आहे. हा तिचा पहिला तेलुगू चित्रपट असणार आहे. तर अल्लू अर्जुन आणि अनुष्का पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करतील.

अनुष्का शेवटची २०१८ मध्ये शाहरुख खानच्या 'झिरो' चित्रपटातून दिसली होती. त्यानंतर ती २०२२ साली आलेल्या 'काला' या चित्रपटातील 'काला' या गाण्यात झळकली होती. यासह २०२२ मध्येच तिने माजी क्रिकेटर झुलान गोस्वामी यांच्या बायोपिकचं चित्रीकरण पूर्ण केलं. परंतु, अद्याप हा चित्रपट प्रदर्शित झालेला नाही. यातच आता तिच्या कमबॅकच्या चर्चा रंगल्या आहेत.

## शब्दकोडे क्र. 89



आडवे शब्द

१. गाळ पण टाकाऊ नाही २अ. ताळतंत्र सुटलेला ५. रोड टॅक्स–मराठीत ८. तोंडाचा पट्टा ११. पुरणपोळीबरोबर केली जाणारी आमटी १२. अटीची भाषा १४. चीज, वस्तू १५. त्याग केला १७. अर्धांगवायू १९. ढीग २१. सत्ता २३. उत्तराधिकारी २४. वाघाची मावशी २५. शेवट, नाश २६. मालक, सरदार, शासनसत्ता २८. पाण्यापासून उत्पन्न ३१. चामखीळ ३३. एकरूप ३४. झाडाचे टॉनिक ३५. सरस्वती (ग्रा.) ३६. बातमी ३७. वारा, त्रास ३८. भांडण ४०. कैफ, धुंदी ४२. कधी मर्दानगीचे कधी भिकारपणाचे लक्षण ४३. नऊ भावना ४५. कडक व चिवट ४६. एक देवयोनी, स्वर्गातील गायक ४७. संत, अवलिया ४८. रागाचा ठिकाणा ४९. गंमत, मजा ५०. स्वयंपाकी ५३. आवाजांचा गोंधळ ५४. सन्मानाची रक्कम ५६. खोदकाम ५८. पुत्री, मुलगी ६०. लाकडी जिना ६२. दात ६४. जबरदस्त, धिप्पाड ६७. चेहऱ्यावरील कांती ६८. काळ्या तोंडाचे माकड ७०. राजपुत्र सलीमची प्रेयसी ७२.सवाद्य ७४. हिंदीत झणझणीत ७५. गायीचे पिल्लू ७७. शिक्षा ७८. मोगऱ्याची माळ ८०. खूळ ८२. अगदी सरळ ८३. दुसऱ्याच्या मनातील जाणणारा ८४. रश्शावरील तवंग, कट

उभे शब्द

१. उमदा, रंगेल २. बतावणी ३. आलेख– चढता वा उतरता ४. पुरुष ५. घागरा ६. बटवा ७. रमापती ८. पृथ्वी, गाय ९. पूर्ण भरतीची वेळ १०. सिंह १३. समशेर १६. पुत्र (हिंदी) १८. दिवस २०. लिंबू पाणी २२. गंध २४. पतंगाचा धागा २५. अकस्मात २६अ. ईदने सांगता होणारा उपवासाचा महिना २७. खोकला २८. पाणी देणारा २९. फळातील द्रव ३०. वस्ती ३२. जास्तीत जास्त व कमीत कमी ३३. टोळीचा प्रमुख ३४. धोकादायक ३७. संधी ३९. बरोबर आलेला फौजफाटा ४१. शिक्षा ४३. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना ४४. संपूर्ण ५०. घराणे ५१. शर्करा ५२. पाडाव, हार ५५. फायदा ५७. पुरुष ५९. वनवास ६१. दार ६३. हुण्डा (हिंदी) ६५. घरंदाज, कुलीन स्त्री ६६. टपालकचेरी ६९. मत देणे ७१. मुंग्यांचे घर ७३. धट्टकट्टा ७६. फटाक्यांची माळ ७७. उथळ पसरट वाटी ७९. रात्र ८१. निर्माण झालेले अंतर

### शब्दकोडे क्र. 88 चे उत्तर

आडवे उत्तर

१.कसम ४.तेंडुलकर ८.हरहर १२.पारावार १३.रमणीय १४.राजधानी १६.काकीनाडा १८.गरम १९.मज २१.समय २३.खोलणे २५.गावकुटाळ २६.रद २७.पारवा ३०.काका ३१.पारा ३२.दमट ३४.कसर ३७.सनदशीर ३८.पायल ३९.पसायदान ४१.कोमल ४३.चाक ४४.मात्रा ४५.रस्सी ४६.लवलव ४७.वरवर ५०.रंभा ५१.आवळा ५२.वसाहत ५५.रत्न ५६.भार ५७.तपन ५८.विनाकारण ६०.शहर ६२.पाक ६३.राम ६५.रवाना ६६.वडीलधारी ६८.तडकाफडकी ७१.तसदी ७४.रसकस ७७.तरुण ७८.वनमाला ७९.रविवार

उभे उत्तर

१.कपार २.सरा ३.मवाली ५.डुलकी ६.कारडा ७.रम ८.हयगय ९.हरामखोर १०.रज ११.धनी १५.धावणे १६.काजळ १७.नाठाळ १९.पाव २०.मटार २१.सरकार २२.मद २४.लवाद २५.गायक २७.पारायण २८.खोट २९.मनन ३०.काशीयात्रा ३१.पापा ३३.मखमल ३५.सपक ३६.रसा ३७.सदाशिव ४०.कारभार ४१.कोवळा ४२.लवकर ४३.चाकवत ४६.लवकुश ४७.वहन ४८.रत ४९.रचना ५३.सापशिडी ५४.फारकत ५६.भारवाहक ५८.विपरीत ५९.कापा ६१.हर ६३.राका ६४.मफलर ६६.वसंत ६७.लक्ष्मण ६९.डगला ७०.कीरवा ७२.सव ७३.दीन ७५.सर ७६.सर्दी

# संग्रामपूर, चिखली व मेहकर तालुक्यातील रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाकडून घोषीत केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील ५९ ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये संग्रामपूर तालुक्यातील चार रिक्त पद, चिखली तालुक्यातील सहा पदे तर मेहकर तालुक्यातील चार ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झाला आहे. या ग्रामपंचायतींमध्ये आचारसंहिता लागू असून निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन तहसिलदार तथा ग्रामपंचायत




निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.

**संग्रामपूर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच/सदस्य रिक्त पदांचे गावे :** मारोडा ग्रामपंचायत प्रभाग क्र.३ (अनुसूचित जमाती), धामनगांव ग्रामपंचायत प्रभाग क्र.२(ना.मा.प्र.प्रवर्ग),वकाणा ग्रामपंचायत प्रभाग क्र.२( ना.मा.प्र.प्रवर्ग महिला व सर्वसाधारण प्रवर्गातील) असे चार रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे.

**मेहकर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच/सदस्य रिक्त पदांचे गावे :** ग्रामपंचायत पारडा, ग्रामपंचायत पेनटाकळी, ग्रामपंचायत वाग्देव व ग्रामपंचायत दुर्गबोरी असे चार रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे.

**चिखली तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच/सदस्य रिक्त पदांचे गावे :** थेट सरपंच पदासाठी कव्हळा ग्रामपंचायत(ना.मा.प्र), कोनड ग्रामपंचायत(ना.मा.प्र./स्त्री), किन्ही सवडत ग्रामपंचायत(अनुसूचित जमाती) तर ग्रामपंचायत सदस्य पदासाठी किन्हीनाईक ग्रामपंचायत प्रभाग क्रमांक १ व ३ (अ.ज. स्त्री), बोरगाव वसु ग्रामपंचायत (अ.जा.) असे सहा रिक्त ग्रामपंचायत थेट सरपंच व सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे.

**निवडणूक कार्यक्रम याप्रमाणे :** निवडणूकीची अधिसूचना सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी संबधित तहसिल कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. या कार्यक्रमानुसार निवडणुकीकरीता नामनिर्देशनपत्र दि. ७ ते १३ एप्रिल २०२६ पर्यंत सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी ३ वाजेदरम्यान स्वीकारले जाणार आहे. नामनिर्देशन पत्र छाननी बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजूपासून छाननी संपेपर्यंत. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली आहे. या निवडणूकीचे मतदान मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं ५.३० वाजेपर्यंत होणार असून मतमोजणी बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार आहे, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## रखरखत्या उन्हात अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा एल्गार; किमान वेतन व पेन्शनसाठी बुलढाण्यात मोर्चा




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** किमान वेतन आणि सेवानिवृत्तीनंतर पेन्शनच्या मागणीसाठी बुलढाण्यात आज अंगणवाडी सेविका व मदतनीसांनी रखरखत्या उन्हात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत जोरदार आंदोलन केले.

अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सध्या मानधनावर काम करावे लागत असून, त्याऐवजी किमान वेतन लागू करण्यात यावे तसेच सेवानिवृत्तीनंतर पेन्शन योजना लागू करावी, या प्रमुख मागण्यांसह विविध मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला.

मोर्चादरम्यान महिला कर्मचाऱ्यांनी तीव्र उन्हाची पर्वा न करता रस्त्यावर उतरून शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. ''किमान वेतन मिळालेच पाहिजे'', ''पेन्शन हक्काची आहे'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

मोर्चा शहरातून मार्गक्रमण करत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी प्रतिनिधीमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत आपल्या मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी केली. या आंदोलनात जिल्ह्यातील मोठ्या संख्येने अंगणवाडी सेविका व मदतनीस सहभागी झाल्या होत्या.

## एचपीव्ही लस सुरक्षित; अफवांवर विश्वास ठेवू नका - जिल्हा आरोग्य विभागाचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महिलांमध्ये वाढत असलेल्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर प्रभावी प्रतिबंध करण्यासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेली एचपीव्ही () लसीकरण मोहीम पूर्णपणे सुरक्षित व परिणामकारक असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी दिली आहे.

सध्या समाजमाध्यमांवर एचपीव्ही लसीबाबत विविध अफवा पसरवल्या जात असून त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. मात्र, नागरिकांनी अशा अपप्रचारावर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत आरोग्य विभागाच्या माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या मोहिमेअंतर्गत १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींना मोफत एचपीव्ही लस दिली जात आहे. ही लस गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून लसीकरण पूर्णतः ऐच्छिक आहे. तसेच, पालकांची संमती घेतल्यानंतरच लसीकरण करण्यात येत असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बुलढाणा अनिल आकाळ यांनीही या मोहिमेचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनींच्या आरोग्याच्या दृष्टीने ही मोहीम अत्यंत आवश्यक असून सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालकांनी यासाठी सक्रिय सहकार्य करावे व विद्यार्थिनींना लसीकरणासाठी प्रोत्साहित करावे, असे त्यांनी सांगितले. एचपीव्ही लसीकरण सुविधा सर्व शासकीय रुणालये, उपजिल्हा रुणालये, ग्रामीण रुणालये तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध आहेत. लाभार्थ्यांची नोंदणी व लसीकरणाचे प्रमाणपत्र वितरण डिजिटल पद्धतीने करण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य विभागामार्फत सर्व नागरिक आणि पालकांना आवाहन करण्यात आले आहे की, अफवांना बळी न पडता आपल्या मुलींचे वेळेत लसीकरण करून त्यांना गंभीर आजारापासून सुरक्षित करावे.

## ओबीसी जातीनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी बुलडाण्यात जोरदार मोर्चा; घोषणांनी शहर दणाणले

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** ओबीसी समाजाची जातीनिहाय जनगणना तात्काळ करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी आज बुलडाणा शहरात भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय ओबीसी पिछडा वर्ग यांच्या वतीने भव्य जिल्हास्तरीय मोर्चा काढण्यात आला.

देशव्यापी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर २३ मार्च रोजी हा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. वामन मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या आंदोलनात ओबीसी जनगणना, यूजीसी कायदा लागू करणे, २०११ पूर्वी नियुक्त शिक्षकांना परीक्षेतून सूट देणे तसेच ईव्हीएम हटवण्याच्या मागण्या जोरकसपणे मांडण्यात आल्या.

राज्य महासचिव मा. भागवत जाधव यांच्या नेतृत्वाखाली निघालेला हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथून सुरू



होऊन जय स्तंभ चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. ''ओबीसींची जातीनिहाय जनगणना झालीच पाहिजे'', ''ईव्हीएम हटवा, संविधान व देश वाचवा'', ''यूजीसी कायदा लागू करा'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. मोर्चाच्या शेवटी जिल्हाधिकाऱ्यांना महामहीम राष्ट्रपती यांच्या नावे निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनात संगिता मोहोड, संजय धुरंधर, नितीन हिवाळे, सचिन इंगळे, संध्याताई हिवाळे, सारीका जंवजाळ, प्रिती धुरंधर, जया उजागरे, कांचन गांधारे, सिमाताई मिसाळ, शुभम मोरे, पवन निंबाळकर, शेख ऐफाज, भास्कर कंकाळ, नागेश डाखोरे, अमोल डाखोरे यांच्यासह जिल्ह्यातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## नांदुरा येथे राज्यस्तरीय शालेय तेंग सु-डो स्पर्धांचे आयोजन

### १४, १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींचा सहभाग- २४ व २५ मार्च रोजी स्पर्धा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच तेंग सु-डो स्पोर्ट्स असोसिएशन, नांदुरा यांच्या सहकार्याने नांदुरा येथे राज्यस्तरीय शालेय तेंग सु-डो क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि. २४ व २५ मार्च २०२६ दरम्यान छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह, नगर परिषद, नांदुरा येथे पार पडणार असून १४, १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींचा सहभाग राहणार आहे.

या स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्यातील विविध विभागांतून प्रत्येकी ४८ मुले व ४८ मुली सहभागी होणार आहेत. तसेच प्रत्येक संघासोबत प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, पंचाधिकारी व स्वयंसेवकांचा सहभाग असणार असून सुमारे ५०० जणांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग अपेक्षित आहे.

स्पर्धेचा उद्घाटन समारंभ २४ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता होणार असून यावेळी क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे अधिकारी, जिल्हा क्रीडा परिषदेचे पदाधिकारी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते, अमरावती विभागाचे उपसंचालक तसेच विविध क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेसाठी खेळाडूंच्या निवासाची व्यवस्था हरसिद्धी लॉन, खामगाव रोड येथे करण्यात आली असून भोजनाची व्यवस्था स्पर्धा स्थळी करण्यात आली आहे. तसेच सभागृहात तेंग सु-डो खेळासाठी दोन एरिना (कोर्ट) तयार करण्यात आले आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्या कार्यरत असून आयोजन समिती, तांत्रिक समिती, तक्रार निवारण समिती, वैद्यकीय, निवास, भोजन, प्रसिध्दी व स्वच्छता समित्या समन्वयाने काम करत आहेत.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच तेंग सु-डो स्पोर्ट्स असोसिएशन, नांदुरा यांचे पदाधिकारी प्रयत्नशील आहेत. जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेचा आनंद घ्यावा, तसेच स्थानिक शाळांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा पाहण्यासाठी पाठवावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

## वृत्तविशेष...

### थेट कर्ज योजना; लाभार्थ्यांची २ एप्रिलला लॉटरी पद्धतीने निवड

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, बुलढाणा जिल्हा कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने करण्यात येणार आहे. लाभार्थी निवड दि. २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे चिठ्ठीद्वारे (लॉटरी पद्धतीने) केली जाणार आहे.

अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या लाभार्थी निवड समितीच्या बैठकीत एकूण १२६ अर्ज पात्र ठरविण्यात आले आहेत. यामध्ये ८६ पुरुष व ४० महिला लाभार्थ्यांचा समावेश आहे. यापैकी एकूण ९० लाभार्थ्यांची अंतिम निवड करण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत प्रकल्प मर्यादा एक लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे.

पात्र अर्जदारांची यादी महामंडळाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली असून संबंधितांनी याची नोंद घ्यावी. तसेच जिल्ह्यातील सर्व पात्र अर्जदारांनी संबंधित दिवशी उपस्थित राहावे, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक दिनेश श. पाखमोडे यांनी केले आहे.

### अण्णासाहेब पाटील यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन




**बुलढाणा/प्रतिनिधी :** कष्टकरी समाजाचे कैवारी व मराठा क्रांतीसूर्य स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्त अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय बुलढाणा येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यांच्या सामाजिक कार्याचा व कष्टकरी समाजासाठी दिलेल्या योगदानाचा यावेळी गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला. यावेळी जिल्हा कौशल्य विकास मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा येथील सहायक आयुक्त गणेश बिटोडे, जिल्हा समन्वयक पुरुषोत्तम अंभोरे, वैभव मुंढे, सुरज जगताप, कर्मचारी वर्ग व महामंडळाचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेगाव येथे २८ ते ३० मार्च दरम्यान सामाजिक न्याय योजनांचे मल्टिमिडिया छायाचित्र प्रदर्शनी

नागरिकांनी लाभ घ्यावा; जिल्हा माहिती कार्यालयाचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा माहिती कार्यालय व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने, दि. २८ ते ३० मार्च २०२६ या कालावधीत सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जातींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शेगाव येथील शेगाव नगर परिषदचे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी नगर भवनात मल्टिमिडिया छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या मल्टिमिडिया छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते दि. २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी, सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

तीन दिवसीय या मल्टिमिडिया छायाचित्र प्रदर्शनामध्ये सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती छायाचित्रे, माहिती फलक व दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने सादर करण्यात येणार आहे. अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांसाठी शिक्षण, स्वयंरोजगार, निवास व आर्थिक सहाय्य योजनांविषयी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिक, अधिकारी व कर्मचारी, शालेय विद्यार्थ्यांनी या मल्टिमिडिया छायाचित्र प्रदर्शनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी यासेरोद्दीन काझी यांनी केले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात शहिदांना अभिवादन



**बुलढाणा/प्रतिनिधी :** थोर क्रांतिकारक शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना शहीद दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हाळे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहाशीनी गोणेवार तसेच उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.